मराठी शब्दप्रयोग, वाक्प्रचार आणि म्हणी

श्रीरंग कौलगी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

मराठी शब्दप्रयोग, वाक्प्रचार आणि म्हणी

ललित लेख

श्रीरंग कौलगी

मराठी शब्दप्रयोग, वाक्प्रचार आणि म्हणी

(ललित लेख)

लेखक: श्रीरंग कौलगी

पत्ता : सी ६, अमेय अपार्टमेंट्स, काशिनाथ धुरू रोड, दादर, मुंबई, ४०० ०२८

फोन +९१ ९९२०६ १२९९६

ईमेल: shreerangkaulgi@gmail.com

ब्लॉग/ फ़ेबु/इतर shreerangkaulgi

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : - ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २१ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- श्रीरंग कौलगी, मोबाईल - +९१ ९९२०६ १२९९६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखकाचा परिचय

माझे नाव श्रीरंग कौलगी, शिक्षणाने आणि पेशाने मेकॅनिकल इंजिनियर.

माझे कार्यक्षेत्र नवीन मशीन डिझाइन्स करणे, ती डिझाइन्स विकसित करणे, त्याचे पहिले उत्पादन, म्हणजे प्रोटोटाईप करतांना बाहेर येणाऱ्या अडचणी सोडविणे आणि मग ती मशीन वापरात आणायला मदत करणे असे होते.

नव्याने आणि मुळापासून विचार करायला लागणे ही आमच्यासाठी पहिली आणि मूलभूत गोष्ट होती.

त्या अनुषंगाने आजूबाजूला चौकस नजरेने पहाणे आणि मिळेल तिथून नव्या कल्पना प्रत्यक्षांत आणणे हे आमच्यासाठी आवश्यकच होते.

जगाकडे चौकस दृष्टीने बघतांना आणि दिसलेल्या गोष्टींची ऍनालिटिकल चिरफाड करताना काही गोष्टी नव्याने सुचल्या त्या इथे मांडल्या आहेत. त्यांत आमची मायबोली मराठी सुद्धा आली.

एका इंजिनियरच्या दृष्टीतून जग कसे दिसते याची झलक आहे ही. पण अगदीच तांत्रिक चिरफाड नाही ही. इथे सगळ्या गोष्टी नव्या नाहीत पण वेगळ्या अंगाने दाखवायचा एक प्रयत्न केला आहे.

प्रयोग कसा झाला आहे ते वाचक ठरवतील.

श्रीरंग कौलगी
संपर्क - +९१ ९९२०६ १२९९६

अर्पण पत्रिका

आता असले काही लिहायचे तर त्या म्हणींचे जनक माहित असायला पाहिजेत ना? ते कुठे आहेत? मग त्या अदृश्य अनोळखी जनकांना हा संग्रह अर्पण करतो.

लिहिलेले कोणीतरी वाचून चुका नाही दाखवल्या तर कसे होणार? पण आमच्या निवडक वाचकांनी नुसते वाचून चुका नाही दाखवल्या पण अजून चांगले करायला प्रोत्साहन दिले त्या टीकाकारांना हा संग्रह साभार अर्पण.

आपल्याला बरेच काही करावेसे वाटते त्या जगन्नियत्याची प्रेरणा असल्याखेरीज आपले हात कसे चालणार? त्याची कृपा म्हणून त्याच्याच चरणी ही कृती अर्पण करतो.

आमचा वाचकवर्ग म्हणजे आमची स्फूर्ती. वाचक आहेत म्हणून लेखक बनतात.

आमच्या वाचक देवाच्या चरणी हे लेखरूपी पुष्प अर्पण करतो.

प्रस्तावना

मराठी आमची मातृभाषा. निरनिराळ्या गोष्टींनी सजलेली. अर्थात तिच्यामध्ये म्हणी आणि वाक्प्रचार आहेतच.

सगळ्या म्हणी आणि वाक्प्रचार काही न काही विशेष सांगून जातात.

त्या म्हणींचा उगम आमच्या अनुभवातूनच आला आहे यांत काय संशय?

प्रत्येक म्हण आणि वाक्प्रचार आपल्या कृतींना किती चपखल बसतो ते सांगायला नको.

अश्या म्हणीतून एका शब्दांत कितीतरी सांगता येते. त्यापैकी काही म्हणी, शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार इथे एकत्र आणले आहेत.

थोडी उदाहरणे त्यांना जोडून.

अनुक्रमणिका

पाताळयंत्री
गुलछबू
आग्यावेताळ
रडतराऊत
भोळासांब
दात आहेत पण...
भावना दुखावणे
आरंभशूर
अग अग म्हशी...
अति शहाणा त्याचा...
एक ना धड...
घरचं झालं थोडं...
घरांत ढेकूण झाले...
दगडापेक्षा वीट मऊ
सुसरबाई तुझीच पाठ मऊ
नकटीच्या लग्नाला...
असेल माझा हरी तर
लाथ मारीन तिथे
कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ
खाल्ल्या मिठाला जागणे
काखेत कळसा गावाला वळसा
नाचता येई ना अंगण वाकडे
बळीचा बकरा

पाताळयंत्री

मराठीमध्ये काही शब्द अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहेत त्यातला एक "पाताळयंत्री".

पाताळयंत्री कोणाला म्हणावे?

आता मनुष्यस्वभाव वेगवेगळे असणारच. एकाच सिच्युएशनमध्ये वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या वागतात हे आपण बघितलेच आहे.

काही लोक सगळीकडे शुद्ध, शुभ आणि चांगलेच बघतात. काहींना प्रत्येक गोष्टीत वाईटच दिसते. अर्थात चांगले वाईट हे सापेक्षच असते हे अगदी मान्य आहे.

काही लोकांना बघतील तिथे संशय, दुष्टपणा, खोटेपणा आणि दिसते त्यापलीकडचे बघायचीच दृष्टी असते. त्या लोकांना पाताळयंत्री म्हणायचे का?

समजा एक लग्न होते आहे. पाहुणे मंडळी काय विचार करतील? किती छान जोडा आहे. कसे एकमेकांंना अनुरूप आहेत. मस्त सुखाने संसार करतील.

एखादा असा विचार करील की बायको नवऱ्यापेक्षा काळी दिसते आहे. आणि दोघांची उंची एकसारखीच आहे. शिवाय दोघे एकसारखे शिकलेले आहेत आणि एकसारख्या कंपनीत नोकऱ्या करत आहेत. मग या दोघांचे लग्न किती टिकेल? लग्न झाल्यावर भांडणे कधी सुरू होतील? आणि त्या दोघांचे वेगवेगळे मित्र मैत्रिणी त्यांना उचकवतील का लग्न झाल्यावर?

अशी व्यक्ती पाताळयंत्री म्हणायची का? तिचा संशयी स्वभाव तिला दुष्ट करील की ती व्यक्ती या दोघांना भावी संकटापासून सावध करून वाचवील? अशी व्यक्ती औषधाचे किंवा सर्जनच्या सुरीचे काम करील का?

सरळ चाललेल्या गाड्याला खीळ घालायचे काम करणे, मित्रांच्यांत, कुटुंबांमध्ये भांडणे लावून देणे, एखाद्याच्या मनात संशयाचे भूत पाठवून देणे, सरळ गोष्टी अडचणीत कश्या येतील ते बघणे, साध्या सिंपल वाक्याचा वेडावाकडा अर्थ काढणे, एखाद्याचे कौतुक न बघवणे, जमेल तिथे वाकडी गोष्ट करणे अश्या स्वभावाच्या लोकांना पाताळयंत्री म्हणायचे का?

समाजात आणि जास्त करून राजकारणात असे लोक खूपच उपयोगी ठरत असतील. तिथे सरळ चालू न देणे हाच मूळ हेतू असतो.

गुप्तहेर, पडद्यामागे राहून सूत्रे हलवणारे सूत्रधार, पोलिसांना मदत करणारे सल्लागार, डिफेन्स रिसर्च करणारे लोक, आंतरराष्ट्रीय राजकारण करणारे लोक, सरकार पाडणारे आणि अस्थिर करणाऱ्या कारवाया करणारे किंवा करवणारे लोक हे समजलं आवश्यक असतात का.

सार्वजनिक आणि प्रायव्हेट जीवन जगण्यासाठी अशी फंक्शन्स पाहिजेतच की नाही? अगदी कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सुद्धा आवश्यक मानली आहेत. अश्या लोकांना कसे डेव्हलप करायचे, त्यांचा कसा उपयोग करून घ्यायचा आणि त्यांना अंगठ्याखाली कसे ठेवायचे याचे डिटेलवार वर्णन आहे त्यांत.

असे जर आहे तर पाताळयंत्री लोकांना वाईट का म्हटले जाते? भले ते कुटुंबात, गावात, राज्यांत किंवा देशांत असोत. त्यांचाही एक विशिष्ट उपयोग आहे.

सीआयए, केजीबी, एमआय, रॉ, आयएसआय, सीबीआय, हेरखाते या संस्था येऊच शकल्या नसत्या जर पाताळयंत्री लोक नसते तर.

बोला, बरोबर आहे का हे म्हणणे?

गुलछबू

मराठी भाषा रांगड्या लोकांची भाषा आहे असे म्हणतात. इथे "मोडेन पण वाकणार नाही", "ताठ मानेने जगतो", "शहाण्णव कुळी सांगतो" "मुजरा करत नसतो" असे भीतीदायक शब्दप्रयोग ऐकायला मिळतात पावलो पावली आणि इथले संत "महापुरे झाडे जाती तेथे लोहाळे वाचती" असा उपदेश करतात.

अश्या या रांगड्या भाषेत " गुलछबू" शब्द कुठून शिरला आहे ते कळत नाही. बहुतेक त्या गुलजार दिल्लीच्या गुलछबू सुलतानांनी आणला असेल. विरोधाभास आहे की नाही?

नुसता तो "गुलछबू" शब्द म्हणून बघा, कसे वाटते ते. शब्दाने चित्र उभे रहाते की नाही?

समजा एखाद्या दांडगा दिसणाऱ्याचे नाव गुलाबराव असेल तर कसे वाटेल? कसा माणूस डोळ्यासमोर उभा राहील?

आपल्या बारा राशींचे बारा स्वभाव त्या राशीचक्र पुस्तकात नीट वर्णन केलेले आहेत, त्यांत गुलछबू हाही स्वभाव येतो.

आता काही लोकांना लढाई, मारामारी, युद्ध, तलवारी, शस्त्रे आणि अस्त्रे अजिबात आवडत नाहीत. त्यांना छान स्वप्नील वातावरण, राजकन्या, पऱ्या, अत्तर लावलेले रुमाल, गुलदस्त्यातून पाठवलेली प्रेमपत्रे, लावण्या, गजल-ए-इष्क, माषुका, प्यार मोहोब्बत, लव्ह

स्टोरी, शृंगार रसात चप्प भिजलेली गीते, प्रेमात बुडालेले लोकच आवडतात.

हिंसा, दुष्टपणा, तिरस्कार त्यांच्या मनाला भावत नाही. त्यांची हिंसेची जास्तीत जास्त मजल बोटे मोडण्यापर्यंतच जाते. बायकांच्यात वावरायला त्यांना काहीही संकोच वाटत नाही. उलट छानच वाटते. बायकांना सुद्धा त्यांना वागवायला संकोच वाटत नाही, उलट छानच वाटते.

मग काय झाले? सगळेजण युद्धखोर सैनिकच असायला पाहिजेत का? जीवनांत प्रेम, लाडीगोडी, रोमान्स, गोड गुपिते असत नाहीत का? त्यांना जागा कोण देणार? गुलछबू स्वभावाचे लोकच ना?

असे लोक नसते तर आयुष्य कसे वैराण, क्रूर, कोरडे, वाळवंटी, लालभडक झाले असते? हा रोमँटिक पैलू देवाने दिला आहे म्हणून आयुष्य सुसह्य झाले आहे की नाही? हिरवे निळे गुलाबी रंग दिसतात ना?

असे रंग आणि असा रोमँटिक पैलू स्त्रियांना असाईन केलेला आहे, नाही? त्यांनी क्रूर, कपटी, दुष्ट, शूर, लढाऊ असू नये अशीच अपेक्षा नव्वद टक्के लोकांची असते, नाही? आता इथे तलवार उगारू नका माझ्यावर, मी एकटा म्हणत नाही असे.

गुलजार नवरा आणि लढाऊ बायको अशक्य नाहीत पण मिसफिट वाटतात की नाही? खरे खरे बोला. नुसते पोलिटिकली करेक्ट उत्तर देऊ नका.

जरा संगीत, नाट्य, फिल्म, साहित्य या गोष्टींकडे नजर टाका. ऐंशी नव्वद टक्के असे गुलजार, गुलछबू, गुलकंदी अश्या "गुल" ने सुरू होणाऱ्या गोष्टींनी भरले आहेत असेच दिसेल.

अहो जरा इथे लक्ष द्या. पुनरोत्पादन हा प्राण्यांचा नैसर्गिक कार्यक्रम आहे. तो या "गुल" ने सुरू होणाऱ्या गोष्टीखेरीज कसा साध्य होणार? अगदी तो वाघोबा सुद्धा त्याच्या वाघिणीसमोर गोंडा घोळतो. थोडावेळ का असेना गुलछबू होतो.

तर आमचे गुलाबराव काय करतात इथेही लक्ष द्या. नुसते ताठ कणे, अभिमानी वृत्ती, लाल डोळे, रागीट चेहरा, कमरेला समशेर, एक घाव दोन तुकडे असे वागू नका.

आग्यावेताळ

कितीही शूर व्यक्ती असली तरी ती कधी न कधी टरकून जातेच. फक्त कारण तसेच भारी पाहिजे.

आता बघा "आग्यावेताळ" आणि "रानदांडगा लांडगा" कसे टरकवणारे शब्दप्रयोग आहेत की नाहीत ते. एखादा आग्यावेताळ येऊन समोर उभा राहिला तर भले भले शूरवीरही दचकतील की नाही ते. आणि तो रानदांडगा लांडगा समोर आला तर अंगातली शक्तीच वितळून जाईल की नाही?

काही लोक मुळातच असे भडकू स्वभावाचे असतात. तरुण असतांना उगाच चिडायचे, एकदम मारामारीवर यायचे, सारखे आपले दंड फुगवून दाखवत दुसऱ्या बरोबर बोलायचे, सारखा आपला राग दाखवत लाल भडक डोळे वटारून बघायचे अशी संवयच असते त्यांना. जरा वय वाढले की वाऱ्याशीही भांडायचे. यांना कोणी आप्त मित्र असतात की नाही?

असला भडकूपणा देव त्यांना का देतो? त्यांना लोक भितात ते बघून त्यांना काय आनंद मिळतो? देवाने आपल्याला शक्ती इतरांना घाबरवण्यासाठीच दिली आहे असे त्यांना का वाटते?

आग्यावेताळ एक फक्त रागीट, नेहमी चिडलेला, जरा काही झाले की अंगावर ओरडायला येणारा असेल, पण तो कदाचित एकदम हल्ला नाही करायचा.

तो रानदांडगा लांडगा मात्र पक्का खुनशी असणार आहे. वाटसरूंना लुटणे, बायामुली पळवून नेणे, खांद्यावर कायम कुऱ्हाड ठेवून दिसेल त्याच्यावर उगारणे असले करायला त्याला काहीच वाटत नाही.

म्हणे मंगळ ग्रह चंद्राबरोबर असतांना यांचा जन्म होत होतो आणि मग ते अश्या स्वभावाचे होतात. आता मंगळ चंद्राबरोबर दर महिन्यांत एकदा तरी जवळीक करतोच, किंवा असे म्हणा की चंद्र मंगळाच्या घरी महिन्यांत एकदा येतोच. नेमका त्याच वेळी हा महापुरुष जन्मला तर त्याला असा स्वभाव देऊन जातो. असेल बुवा.

मग असे आग्यावेताळ आणि दांडगे लांडगे जागोजागी दिसायला पाहिजेत. तसे तर दिसत नाही. म्हणजे त्यांत अजून काहीतरी डायल्यूट करणारी कोणीतरी शक्ती असली पाहिजे या विश्वांत.

लढाईचा प्रसंग आला, हातापायी करायची वेळ आली की असे लोक हंड्रेड परसेन्ट उपयोगी असतात यात काही संशय नकोच. उलट असेच लोक पाहिजेत त्या वेळी. तिथे गुलजार लोकांचे काय काम?

सैन्यातील व्यक्ती अश्या असतात बऱ्याच प्रमाणांत आणि पोलीसात सुद्धा. रणांगणावर चेवाने झुंजावे तर ते यांनीच. ते लांडग्यांच्या वृत्तीचे लोक शत्रूचा पूर्ण नायनाट करण्यांत एकदम माहीर.

पण लढाई, युद्ध, मारामारी नसेल तेंव्हा काय? यांना कोण आवरणार? अर्थात त्यांच्या स्त्रिया. स्त्रियांच्या मध्ये एक अलौकिक शक्ती असते जी दिसत नाही पण अश्या भयंकर लोकांना आवर घालते. त्या स्त्रियांना यांचा भडकूपणा कसा जाळत नाही? की त्या हे सगळे सहन करूनही त्यांना आवर घालतात?

जरा इतिहासाची पाने उघडून बघा. जमदग्नी, परशुराम, दुर्वास, वाल्या कोळी नंतर वाल्मिकी ऋषी झालेला, असे विद्वान ऋषी सुद्धा या कॅटेगरीमध्ये बसतात. आणि ते अहमदशहा अब्दालीचे अफगाण सैनिक? त्यांनी तर पाठलाग करून मराठ्यांची लांडगेतोड केली असे बखर लिहिणारे लोक सांगून गेले आहेत.

असे लोक विद्वान असण्याची शक्यता सुद्धा बरीच आहे. सगळे हे आग्यावेताळ म्हटलेले ऋषी महाविद्वान होतेच. लोकांना लुटणारा लांडग्यांच्या स्वभावाचा वाल्याकोळी शांत नारदाच्या एका प्रश्नाने कन्व्हर्ट होऊन ऋषी झाला आणि रामायण रचले त्याने. शिवाय रामाचे चिरंजीव आणि सीतामाईचे सुद्धा पालन केले त्याने.

असेच आमचे कोणी कोणी प्रोफेसरही. आमचे जरा चुकले किंवा वर्गांत थोडेसे लक्ष इथेतिथे गेले की जमदग्नीचा अवतार धारण करून सरळ वर्गाबाहेर हाकलून दिले आहे आम्हाला.

पण म्हणून अश्या लोकांबद्दल आम्हाला राग आला का? अजिबात नाही, उलट आदरयुक्त भीतीच वाटली आणि आम्ही बरोबर लाईन वर आलो.

हे कोणी नाकारेल का?

रडतराऊत

बिनधास्तपणा हा गुण आहे की दोष हे सांगता येणार नाही. तसेच चिंता किंवा काळजी हे नेहमीच लागणारे गुण किंवा दोष आहेत हेही सांगता येणार नाही. बहुतेक लोकांच्यात सगळे गुण थोड्याफार प्रमाणांत असतातच. पण अति झाले की मग त्या माणसाला विशेषण लागते.

आता "रडत राऊत" हा शब्दप्रयोग बघा. डोळ्यासमोर आणा त्याचे चित्र. कशी व्यक्ती वाटते? नेहमी चिंता, काळजी, भीती यांनी युक्त आणि बिनधास्तपणा, धीर, शौर्य यांचा अभाव अशी वाटते का? घोड्यावर बसवली तरी पहिल्या चान्सला खाली उतरणारी?

काहीही झाले तरी चिंता, तक्रारी करणे, चांगल्यांंत सुद्धा धोके, भीती दिसणे, डेरिंगबाजपणाचा अभाव, जिकडे तिकडे निराशा दिसणे असे काही लोकांचे का होते ते कळत नाही. आपण त्याच्या मनांत जाऊन कल्पना करू शकत नाही.

चिंता करणे, वाईटाचा संशय येणे, नॉर्मल गोष्टी सुद्धा धोक्याच्या वाटणे, सारखी कश्या न कश्याची काळजी लागून राहणे ही रडतराऊतांची वरवर दिसणारी लक्षणे.

ते झाड इतके हलते का आहे? उद्या सूर्य नीट उगवेल का? ही पृथ्वी सूर्य गिळून टाकणार आहे असे ते शास्त्रज्ञ का म्हणतात? मला असे पोटात डुचमळल्यासारखे का होते आहे? ते बॉस अशी डेडलाईन सारखी सारखी का देतात? नाही ते डेअरिंग करायला मला कश्याला सांगत आहेत? मला हे करायला झेपेल का? त्यापेक्षा मला जमत नाही असेच सांगून टाकू का? उगाच शूरवीरपणा कश्याला करायचा? हे आणि असे विचार सारखे मनांत घोळतात. आपले इतर गुण, कला चांगल्या आहेत आणि त्या लोकांना आवडतील असे करावे असे त्यांना वाटले तरी हे दोष त्यांना झाकोळून टाकतात.

मग असे लोक जगतात कसे? इतके डिफेंसिव्ह, निराशावादी असून त्यांचे आयुष्य कसे चालते? त्यांनाही जगण्यासाठी काही ना काही काम करावेच लागते. त्यांच्यांत असलेले गुण आणि कला यांचा विकास होत नाही का? होतो ना.

खूप चांगले चित्रकार, कवी, लेखक, आर्टिस्ट असू शकतात. त्यांनाही पत्नी मुले संसार असतो. पण धोका जरा जरी दिसला कश्यांत तरी लगेच माघार घेतात, हाय खातात आणि हाती घेतलेले काम सोडून देतात.

लीडरशिप नाही जमली तरी बऱ्यापैकी फॉलोअर्स होतात. सारखे संशयी, भीतीचे आणि धोक्याचे विचार येतात मनांत म्हणून धोक्याची

जाणीव करून देऊ शकतात इतरांना. कधी याही गोष्टींचा फायदा होतो. चांगले कलाकार असतात म्हणून कोणाच्यातरी पदरी राहून आपला आणि कुटुंबाचा निर्वाह चालवण्यांत यशस्वी होतात.

अश्या लोकांची बायकामुले त्यांना कसे वागवतात? ती विरुद्ध स्वभावाची असली तरी फारसे खटके उडत नाहीत कारण असे खटके उडायला ते विरोधच करत नाहीत. बायको घेते सांभाळून आपल्या धीराने. मुले फारसा आदर दाखवत नाहीत, पण त्याने काही विशेष बिघडत नाही.

नको त्या कृत्यात हातच घालायचा नाही आणि धोक्याचे कृत्य सोडूनच द्यायचे, कितीही फायदेशीर वाटले तरी, या वृत्तीमुळे तसे त्यांचे आयुष्य सेफली पार पडते. फारसे फायदे होत नाहीत पण तसेच फारसे तोटे किंवा नुकसानही होत नाही.

तुम्ही बघितले असेल कधी की संकट आले समोर तर उपाय शोधण्याऐवजी सरळ देवाचे किंवा एखाद्या साधुबाबाचे पाय धरतात असे लोक. एखादा उपाय कोणी सुचवला तर तो लगेच करण्याऐवजी दहा लोकांना विचारून कन्फ्यूज होतात आणि जमले तर दुसऱ्या कोणावर तरी जबाबदारी ढकलून देतात. अगदीच अंगावर पडले तर कसेतरी रडत खडत करून टाकतात.

आयुष्यांत फारश्या दैदिप्यमान यशाची त्यांना इच्छाही नसते आणि प्रयत्नही करत नाहीत. जमले तेवढे जमले, बाकी आपल्या नशिबात नाही म्हणून सोडून देतात. असेही लोक यशस्वी होतात. मोठे कलावंत हातात. नाव, पैसा त्यांनाही मिळतो पण त्यांच्या पाठीशी कोणीतरी खंबीर उभे असते आणि त्यांना सपोर्ट करत असते. वेली सारखे असतात असे लोक. आधाराची काठी असली तर चांगले फुलतात, फळतात, काठी नसेल तर उभेच रहात नाहीत.

लोकांना वाटते की आपल्याला कोणी रडतराऊत म्हणू नये. कोणाला आवडेल तसे? स्वतःला कोणी तसे विशेषण देईल का? पण स्वभावाला औषध काय? तो तर देवानेच दिलेला असतो ना?

मग दोष देवालाच द्यावा आणि आभार त्याचेच मानावे आपले आयुष्य नीट पार केल्याबद्दल.

भोळासांब

महादेव शंकर, देवांचा देव, भक्ताला प्रसन्न करणारा, अतिशांत स्वभावाचा पण एकदा रागावला की रौद्ररूप धारण करून तांडवनृत्य करून जगाचा विध्वंस करणारा, पण प्रसन्न असेल तर कोणत्याही भक्तावर विश्वास टाकणारा आणि कृपादृष्टी ठेवणारा असा पूजनीय आणि त्याचवेळी वचक ठेवणारा म्हणून मानला आहे आपण.

कोणताही भक्त असो, जेंव्हा तो कठीण तपस्या करून शंकराची भक्ती करतो तेंव्हा शंकर "सांब" बनून त्याच्यावर कृपादृष्टी टाकतो आणि त्याला जे काही पाहिजे ते देऊन टाकतो. भक्तावर संशय कधींच घेत नाही आणि आपल्या "सांब" या नावाला "भोळा" हे विशेषण लावून "भोळासांब" सदाशिव होतो.

ही त्याची प्रकृती माणसानेही उचललेली आहे. आपल्यामध्येही कोणावरही लगेच विश्वास टाकणारे, कोणावरही संशय न घेणारे, कशातही काळेबेरे न बघणारे, जग एक पवित्र जागा आहे आणि इथे वाईट प्रवृत्ती राहूच शकत नाहीत असा ठाम विश्वास असणारे लोक खूप सापडतील. त्यांना दुसऱ्याच्या वाईट हेतूंची किंवा कपटगिरी करण्याची शंकासुद्धा येत नाही.

अशी माणसे देवमाणसेच म्हटली पाहिजेत. निष्पापपणा हा निश्चितच बालकांचा आणि देवांचा गुण असतो. त्यांना काहीही सांगितले तरी त्यांचा विश्वास बसतो आणि बाकीचे जग असेच असेल असेच त्यांना वाटते.

निष्पापपणा, भोळेपणा हा निर्विवादपणे मोठाच गुण आहे. सगळेच तसे असते तर मग किती छान झाले असते. आणि कधीतरी पूर्वीच्या काळांत तसे होतेही असे ऐकले होते.

असत्य, दुरवर्तन, हेवा, राग, लोभ, बेरकीपणा ही महापापे म्हटलीच आहेत. मग ती माणसांत कशी आली. सत्यवृत्तीने राहणाऱ्या लोकांना खोटे बोलणे, खोटे करणे, फसवणे, दुष्टपणा करणे हे शत्रू कसे आपलेसे झाले?

सत्याने, धर्माने राहताना कष्ट करावे लागतात, फळाची प्रतीक्षा करावी लागते, जे फळ मिळेल ते स्वीकारावे लागते.

पण माणसामध्ये आत्ताच्या आत्ता, सर्वोत्तम फळ ते सुद्धा कष्ट न करता मिळावे ही इच्छा झाली तेंव्हा या भोळसांबाच्या स्वभावाची अखेर झाली.

जेंव्हा इतरांनी बघितले की हे लोक सहज मिळवत आहेत तेंव्हा अश्या दुष्ट प्रवृत्तीचा मोठा प्रसार झाला. देवमाणूस असणे ही एक थट्टेची गोष्ट ठरायला लागली. सद्वर्तन हा एक दोष मानला जाऊ लागला. कलियुग सुरू झाले.

पण असे दुष्टप्रवृत्तीचे लोक कायम जिंकू शकतील का? सत्याची आणि धर्माची आणि सद्वर्तनाची काहीच किंमत राहिली नाही का? सगळे भोळेसांब कुठे गेले? ते त्या डायनोसोर्स सारखे एक्सटिंक्ट झाले की की काय? आता या सद्गुणांना कोणीही विचारणार नाही का? सत्ययुग पुन्हा कधीच येणार नाही का? अगदी कल्कीचा अवतार होऊन हे जग अणुयुद्धांत भस्मसात झाले तरीही? आशेचा काहीच किरण दिसत नाही का?

तसे होणार नाही. सत्याचाच अंतिम विजय होतो. "सत्यमेव जयते" हे घोषवाक्य जवळ जवळ सगळ्या जगाने मान्य केले आहे. निष्पापपणा, विश्वासूपणा, दया, क्षमा, शांती, प्रसन्नता नेहमीच जिंकतील. आज त्या दुष्टप्रवृत्तीच्या काळ्या ढगाने झाकोळलेल्या सूर्या सारख्या अदृश्य झालेले दिसत असले तरीही.

भोळासांब बघेल बघेल आणि मग वेळ आली की रुद्र होईल, रौद्ररूप धारण करून तांडव करील आणि सगळ्या वाईट प्रवृत्तींचा नाश केल्याखेरीज पुन्हा आपले शांत प्रसन्न रूप दाखवणार नाही.

भोळ्या सांबांना पुन्हा तो मान तो आदर मिळेल. त्यांचेच गुण श्रेष्ठ आहेत हे सिद्ध होईल.

दात आहेत पण...

देव दयाळू आहे आणि तो सगळ्या गोष्टी बॅलन्स करतो. कोणाला अति देत नाही आणि कमीही देत नाही. माणूस इतर प्राण्यांसारखा एक प्राणी आहे आणि त्यालाही देव सगळे गुणदोष बॅलन्स करून देतो.

आता इतर प्राणी देवाकडे तक्रारी करतात की नाही हे सांगता येणार नाही पण माणूस मात्र देवाकडे खूप तक्रारी करत रहातो. आता बघा ना, आपल्याला पाहिजे ते मिळवण्यासाठी तो देवाला लालूच सुद्धा दाखवतो. मला हे दे मी तुला फुलांचा हार घालीन, मला ते दे मी तुला बोकडाचा नैवेद्य दाखवीन असे नवस बोलतो.

देव सगळे ऐकतो, पण सगळेच ऐकत नाही. चणे देतो खायला आणि दात देतो ते चावायला. पण नेहमीच एकदम देतो असे नाही. आमचा हा भक्त खिन्न होतो आणि म्हणतो "दात आहेत पण चणे नाहीत" आणि मग काही वेळ गेला की म्हणतो "चणे आहेत पण दात नाहीत". फक्त तक्रारी करत राहणे आणि आपले रडगाणे देवापाशी आणि इतरांपाशी गात राहणे एवढे मात्र तो अगदी डिटेलवार करतो.

"दात आहेत पण चणे नाहीत आणि चणे आहेत पण दात नाहीत" हे शब्दप्रयोग अगदी अनुभवातून आले आहेत यांत शंकाच नको. मग

ते चणे कोणत्याही रूपांत असोत आणि दातही कोणत्याही रूपांत असोत.

या पृथ्वीवर नव्व्यांणव पूर्णांक नव्व्यांणव टक्के लोकांना याचा अनुभव आलाच असेल. अजून तरुण असतील तर येईल नंतर. दात आहेत तर चणे नाहीत असे आहे तर ते चणे मिळण्यासाठी काय केले असे विचारले का कधी स्वतःला? चणे खावे लोखंडाचे तेंव्हा ब्रम्हपदी नाचे असाही शब्दप्रयोग आहेच की. आता लोखंडाचे चणे चावण्यासाठी दात कश्याचे असावेत? ते मिळवायला काय करावे लागेल?

असे लोखंडाचे चणे मिळवले कष्ट करून आणि ते चावण्याजोगे दातही मिळवले तसेच कष्ट करून तर ब्रम्हपदी नाचतात का लोक? किती लोकांना हे भाग्य मिळते? आणि किती वेळ? आणि किती वेळा? रेअर आहे की नाही असे सगळे जुळणे?

असे दणकट दात असले, देवाच्या दयेने, तर चावायचे काय?

देवाने असे मुद्दाम केले असणार. दात आहेत तर ऊठ आणि चणे शोध ही त्याची आज्ञाच आहे. कालपरत्वे चणे मिळूनही जातील, कष्ट केले तर. पण तोपर्यंत ते दात काय चावणार? दातांचे म्हणजे आपल्या शक्तीचे आयुष्य सुद्धा मर्यादितच आहे की नाही? मग आपली ऊर्जा खर्च करून मिळवले चणे तर तोपर्यंत ते भक्कम दात जातात पडून.

आता ते चणे कसे खायचे?

तर शोध एखादा उपाय. चणे मऊ करून खा. नाहीतर कुटून खा. तेही नसले जमत तर ते चणे एक्सचेंज कर दुसरे काही खाण्यासारखे असेल त्याच्याशी. रडत बसू नको. सारखी किरकिर करू नको. प्रॉब्लेम आला तर उपाय शोध, बुद्धी दिली आहे ना मी तुला, तिचा उपयोग कर जरा.

देवाचे हे ऐकणेच बेस्ट होईल. मग त्या रडण्या भेकण्यांत वेळ आणि शक्ती न घालवता आहे ते एन्जॉय करता येईल. कोणते दात आणि कोणते चणे हे प्रत्येकाचे स्वतंत्र आहेत. आहेत त्या दातांनी चावता येतील ते आपले चणे आणि ते चणे ज्यांंनी एन्जॉय करता येतील ते आपले दात. दुसऱ्याशी तुलना करून त्याचे दात मला पाहिजेत आणि त्याचेच चणे मला पाहिजेत या आग्रहाला आणि हव्यासाला इथे भीक मिळत नाही.

तो देव दयाळू आहे आणि त्याने सगळ्या गोष्टी बॅलन्स केलेल्या आहेत, तुम्हाला अति दिलेले नाही की तुम्हाला कमी ही दिलेले नाही.

बस समझनेकी बात है ये।

भावना दुखावणे

गेल्या काही वर्षांत एक नवाच शब्दप्रयोग दिसायला लागला आहे आमच्या छापील मराठी मध्ये. जरा काही झाले की कुणा ना कुणाच्या तरी भावना दुखावतात आणि मग ती व्यक्ती किंवा तो समूह दंगा करायला लागतो आहे.

आता हे "भावना दुखावणे" काय आणि कसे होते ते काही समजत नाही. कोणत्या भावना दुखावल्या गेल्या आणि आत्तापर्यंत त्या कुठे होत्या ते काही समजत नाही. मुळांत त्या भावनांचे वर्णन किंवा व्याख्या कोणीच करू शकत नाही किंवा करत नाही.

एक तर भावना दिसत नाही की अगोदर समजत नाही. पुन्हा ती कशामुळे आनंदी होते आणि कशामुळे दुखावते आणि मग तिचे काय होते तेही कळत नाही. फक्त राग आणण्याचेच काम ती करते का की कधी आनंद देण्याचे हे कोणी सांगत नाही.

भावना आपल्या कायद्यांप्रमाणे गूढ, समजायला अवघड आणि एक दुसऱ्यांना छेद देणाऱ्या असतात की काय? तुम्ही रस्त्याने चार पावले चाला किंवा दोन तीन तास तुमचे जीवन जगा, तुम्ही नक्की दोनचार कायदे मोडलेले असतात. असे कां? कारण कायद्यांचा जन्म वेगवेगळ्या वेळी झालेला असतो, मग ते एकमेकांचे म्हणणे कसे

लक्षांत घेणार? मग एक कायदा पाळावा तर दुसरे दोनचार मोडले जातात.

भावना तर त्याहून क्लिष्ट. एक तर त्या सतत जन्म घेतात आणि स्वतः सतत इव्हॉल्व्ह होतात. कायदे होत नाहीत तसे.

भावना दुखावतात हे जसे स्पष्ट होते तसे भावना सुखावतात असे कधी का दिसत नाही?

आपण इथे पब्लिकमध्ये काय होते त्यांत फार डीप नको जायला, तो फारच स्फोटक विषय आहे. नुसती गणपतीची विसर्जन मिरवणूक वर्षातून एकदा मशिदीसमोरून गेली किंवा पंजा गणपतीच्या किंवा कृष्णाच्या देवळा समोरून गेला तरी भावना दुखावतात. नुसत्या शेकडो वर्षे चालत आलेल्या पारंपरिक मराठी म्हणी जरी ऐकवल्या तरी जातीवाचक भावना दुखावून जागृत होतात. जोक सांगणे हा एक रिस्की उद्योग झाला आहे. सरदार, स्कॉच, मारवाडी, कोणाचेही जोक सांगा, भावना दुखावल्या जातील.

घरांत "कायद्याने नातेवाईक" झालेल्या लोकांपासून दूरच रहा. महास्फोटक विषय आहे तो. उपाशी रहायला लागेल आणि अबोला तर मागे लागेलच. नुसते आपल्या घरांत किंवा बिल्डिंगमध्ये किंवा सोसायटीत परखड मत मांडा आणि मग सांगा कुणाच्या तरी भावना दुखावल्या गेल्या की नाही ते.

परवाच आमच्या शेजाऱ्याचे मूर्ख रागीट कुलुंगी कुत्रे आमच्यावर उगाच भुंकले आणि धावून येण्याचा यत्न करूं लागले. त्याला

(कुत्र्याला) आम्ही त्याच्या (कुत्र्याच्या) मातापित्यावरून दोन शब्द ऐकवले. झाले. त्या कुत्र्याचा मानवी पालक भडकला. त्याच्या भावना दुखावून "उद्दीपित" झाल्या जसे काही त्यालाच ते शब्द ऐकवले होते, आणि मग ते कुत्रे राहिले बाजूला आणि आमच्याच भावनांचे उद्दीपन एवढे जाज्वल्य झाले की दरवाजे उघडून आमचे शेजारी बघायला लागले कोणाच्या भावना का दुखावल्या गेल्या ते.

अहो, घरातसुद्धा बी केअरफुल. जोक मारायला जाल आणि मानसिक किंवा शारीरिक मार खाऊन याल, तुम्ही कोणाच्यातरी भावना दुखावल्या आहेत किंवा आजकालच्या भाषेत "भावनाओंको ठेस पहुंॅची" आहे.

पब्लिकमध्ये तर बघायलाच नको. बस मध्ये महिलांची राखीव सीट मोकळी सोडून कोणी जनरल सीट वर बसली आणि उभे असलेल्या तुम्ही तिला रिझर्व्ह सीट वर जा म्हणून अगदी सौम्य भाषेत जरी विनंती केली तरी तिच्या "भावनांना ठेस पहुँॅचणार" आहे. आणि ओरडून सांगितले तर खूप लोकांच्या भावना दुखावल्या जाणार आहेत. जसे काही आपण त्यांनाच सांगितले की कायदा पाळा म्हणून.

म्हणून बंधू भगिनींनो, कृपा करा स्वतः वर आणि अश्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्या.

म्हणजेच काय, दगडासारखे निर्विकार, निश्चल आणि गप्प बसून रहा.

आरंभशूर

"केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे" हा मंत्र अगदी लहानपणापासून शिकवला आणि घोटवला जातो.

कोणतीही गोष्ट कितीही छान आहे म्हणून कोणी सांगितली तरी ती केल्याखेरीज कशी होणार आणि समजणार? म्हणजे "पहले करो फिर बात करो" हे पाहिजे. पुन्हा नुसती सुरू करून नाही तर पूर्णत्वाला नेऊन ती गोष्ट केली पाहिजे.

आपण सुरुवात कितीतरी गोष्टींची करतो पण किती पूर्ण होतात ते पाहिले आहे का? काही लोक असे आहेत की ज्यांना नवनव्या गोष्टी सुरू करायची भारीच उर्मी असते पण ती सुरू ठेवायची आणि नीट पूर्ण करायची याचा पेशन्स मात्र नसतो. "आरंभशूर" हे खास नाव त्यांना दिले आहे.

जरा मागच्या काही १ जानेवारी तारखा आठवून बघा. तुम्ही असे पण केले होतेत का की "मी आजपासून हे करीन ते करीन" आणि तसे सुरूही केले आणि मग काळाच्या ओघांत ते गेले वाहून. अरे, मग तुम्हीही आरंभशूरच आहात की.

पण एक फरक आहे. एखाद्या लहान (किर्तीने) व्यक्तीने जर धडाधड गोष्टी सुरू केल्या आणि मग सोडून दिल्या त्याला आरंभशूर म्हणायचे पण दुसऱ्या कोणी महान (किर्तीने) अगदी तसेच केले तर

त्याला द्रष्टा, समाजाचा दीपस्तंभ, पायोनियर, धडाडीचा नेता, दिर्घदृष्टी म्हणायचे. हे काय? "बहोत ना इन्साफी है ये।", नाही का?

आरंभशूर असणे ही प्रॉपर्टी अगदी कोणाच्यातही असते. आमच्यांत सुद्धा आहे. आम्ही धडाडीने कितीतरी प्रोजेक्ट्स सुरू केली आहेत पण सगळीच पूर्णत्वाला नेणे जमले नाही.

खरे तर प्रत्येक गोष्टीला सुरुवात, मध्य आणि पूर्णत्व अश्या तीन फेजेस असतातच.

काही लोकांना सुरुवात छान करता येते. कोनशीला बसवणे, कॉन्सेप्ट नोट तयार करणे, पहिली सगळी जुळवाजुळव करणे, प्रोजेक्ट सुरू करणे, पहिली कुदळ मारणे, भूमिपूजन करणे अश्या गोष्टी मस्त जमतात.

दुसऱ्या काही लोकांना कोणीतरी चालू करून दिले की मग पुढचे काम करायला छान जमते. त्यांना स्टार्ट हवा असतो, बाकीचे सगळे ते बघतात.

अजून दुसऱ्या कोणी लोकांना गोष्टीचा शेवट करायला आवडतो. त्यांना ते सुटे धागे नीट बांधून प्रोजेक्टची समाप्ती आवडते. ती कशीही असली तरी नीट करतात. अर्धवट पडलेली प्रोजेक्ट्स नीट गुंडाळणे, संपत आलेली कमिशन करणे, सगळे नंतरचे बाळंतपण करणे यात ते

जास्त इंटरेस्ट घेतात. प्रोजेक्ट रोल आऊट करणे, लोकार्पण करणे, फिती कापणे, उदघाटन करणे, शेवटच्या ओव्हर मध्ये मॅच संपवणे अश्या गोष्टी छान करतात.

आता मध्यशूर आणि अंत्यशूर अशी विशेषणे कधी ऐकली नाहीत पण प्रत्येक गोष्टीत ती असतातच.

क्रिकेटचे उदाहरण घेऊ या. टॉप ऑर्डर, मिडल ऑर्डर आणि फिनिशर असे क्लास आहेत. ओपनिंग बॅट्समन आणि ओपनिंग बोलर आहे आरंभशूर नव्हेत का एका परीने?

पण क्लासिक आरंभशूर नंतरच्या फेजेस किंवा स्टेजेस मध्ये अजिबात इंटरेस्ट घेत नाही. त्याची ती मनोवृत्तीच नसते, त्याची एनर्जी सगळी सुरुवात करण्यातच. तो पसंती देतो ती ओपनिंग करण्याला. आणि तो सुरू करून दिलेल्या गोष्टी मोजत बसत नाही, सुरू करतो किंवा करून देतो आणि पुढे निघून जातो.

आरंभशूर हे मराठीतले खास विशेषण आहे पण त्याला एक प्रकारचा हिणकस वास आहे. फक्त आरंभ करणे पसंत नाही लोकांना असा सूर आहे.

आता ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार ती व्यक्ती तसा रोल करणार ना? म्हणजे आपल्याला सगळेच पाहिजेत. आरंभ शूर, मध्यप्रवीण आणि फिनिशर.

तुम्हाला कोणता रोल करायला आवडते?

अग अग म्हशी...

त्या तरुण जोडप्याचे नेहमीप्रमाणे भांडण झाले कडाडून, आणि मग बायको रागावून निघून गेली माहेरी, नेहमीप्रमाणे.

नेहमीप्रमाणेच त्या नवऱ्याने पहिले पाच दहा दिवस मजेत काढले. इकडे तिकडे भटकला, रात्री उशिरा घरी आला, बाहेरचे मस्त खाणे पिणे केले. मग बायकोची आठवण यायला लागली. चैन पडेनासे झाले. आता काय करणार? त्याचा इगो त्याला सासरी जाऊ देईना आणि तिचा इगो तिला सासरी येऊ देईना.

पण गाव होते छोटे. सासऱ्याच्या म्हशी चरायला, पाण्याला आलेल्या दिसायच्या. ते बघून त्याला आयडिया सुचली. पाणवठ्यावर गेला आणि सासऱ्याची म्हैस शोधून तिची शेपटी धरली. आणि एक हिसका दिला. म्हशीला आश्चर्य वाटले आणि ती आपल्या घराकडे चालायला लागली. तिच्या मागे आपला हा तो नवरा. आणि तोंडाने "अग अग म्हशी मला कुठे नेशी" म्हणत.

सासऱ्याच्या घरी पोचली म्हैस आणि आमचा हा नवरा. तोंडाने "अग अग म्हशी मला कुठे नेशी" चा मंत्र चालूच. सासऱ्याला आश्चर्य वाटले पण या नवऱ्याच्या बायकोला नाही.

तिला माहित होते की नवरा बरोब्बर येणार म्हणून. मग तीही थोडी सुखावली नवरा कसा आला नाक मुठीत धरून आणि त्याच्याबरोबर आली परत घरी. मियां बिबी खूष. त्या भांडणाचा सुखांत झाला.

तेंव्हा पासून "अग अग म्हशी मला कुठे नेशी"चा हा वाक्यप्रचार शिरला मराठीत. इतर भाषांत नक्की असणार आहे. शोधून बघा म्हणजे सापडेल.

काहीतरी करायचे तर असतेच. पण करता येत नाही काही कारणाने. मग ही पळवाट सुचविणारा मंत्र किती उपयोगी पडतो ते सांगायलाच नको. मग ते घरांत असो किंवा ऑफिस, कारखान्यांत असो. बेस्ट उपाय आहे. पुन्हा सगळ्यांचा इगो शाबूत रहातो, कोणी हरत नाही की जिंकत नाही. ती म्हैस सगळा ब्लेम घेते. व्हेरी कनव्हिनियंट.

तुम्हाला किती वेळा असे करायला लागले आहे ते आठवून बघा. नक्की दोन पाच वेळा असेल. एखादी अडचणीची गोष्ट करायची तर आहे पण सामाजिक कारणानें किंवा लाज शरमेने सरळ सरळ करता येत नाही तर असे काहीतरी शोधावे आणि "काय करणार. करावे लागते आहे ना" असे म्हणून करून टाकावे.

पुन्हा कोणी टीका केलीच तर "नाईलाज आहे, कोणावरही असा प्रसंग येऊ शकतो" म्हणून आपली सुटका करून घ्यावी आणि टीकाकारालाही एक पळवाट सोडून द्यावी.

कशी आहे ही आयडिया?

अति शहाणा त्याचा...

माणसाने विचार करून वागावे. पण अती विचार करू नये, त्याने एक तर काही कृती होणार नाही, नको त्या शंकाकुशंका येतील मनांत आणि नुकसान होण्याची छान शक्यता.आता त्या शेतकऱ्याचे उदाहरण घ्या. त्याच्याकडे एक दांडगा बैल होता. मोठा धिप्पाड आणि शक्तिवान. एकटा नांगर ओढायचा आणि जड भरलेली बैलगाडी चढाच्या रस्त्यावर एकटा आरामांत खेचून न्यायचा.पण त्याचे खाणेही जबरदस्त होते. दररोज वीस तीस किलो चारा खायचा, ते खास पशुखाद्य समोर ठेवले की फन्ना उडवायचा. शेतकऱ्याला पडली काळजी. हा असा खात राहिला तर माझे निघेल दिवाळे. त्यापेक्षा त्याला कमी खायला घालतो आणि कामही कमी करून घेतो. मग खाणे काम बॅलन्स होईल. खूप विचार केल्यावर त्याला हे सुचले. केले लगेच. बैल खंगत गेला. त्याची शक्ती कमी व्हायला लागली. आता तो हेवी काम करेनासा झाला. बसून रहायला लागला. पण खाणे मात्र अर्धेच झाले, सगळे कमी झाले नाही.शेवटी खायला काळ आणि भूमीला भार झाला.

आता शेतकऱ्याला पश्चात्ताप व्हायला लागला. मग त्याने तो बैल बाहेर मोकळ्यावर सोडला. बैल इकडे तिकडे फिरायला लागला चाऱ्याच्या शोधात. एक दिवस वाघोबा आला आणि बैल मारून घेऊन गेला. आता शेतकऱ्याला दुप्पट पश्चात्ताप झाला, बैलाच्या सिक्युरिटी

साठी काहीच व्यवस्था केली नव्हती त्याने. मग एक कुंपण करून त्याला झापा, म्हणजे गेट बांधले. पण आता काय उपयोग? जो हुवा सो हुवा.शेतकऱ्याने दोन शब्दप्रयोग मराठीला अर्पण केले. "अती शहाणा त्याचा बैल रिकामा" आणि "बैल गेला आणि झापा केला".असे कोण करत नाही तो शोधा.

प्रत्येकाला याचा अनुभव आला आहे. उगाच इगो आणि मोठ्ठे व्हायचे म्हणून काहीतरी कॉस्टली वस्तू घेऊन ठेवायची आणि मग ती वापरायला खर्चिक म्हणून पडून ठेवायची. वस्तू तर डीजनेरेट होणार. मेंटेनन्स नाही केला तर खर्च होणार, उपयोग फारसा नाही.मोठी गाडी, बाईक, किंवा असेच काहीतरी घेतले आणि लावले घरासमोर, रात्री चोर आला आणि घेऊन गेला गुपचूप. झाला पश्चात्ताप. आता काहीतरी व्यवस्था केली पुढच्या गाडी, बाईक किंवा अश्या काहीतरी वस्तूसाठी. काय उपयोग. लॉस होऊन गेला.अती विचार करत बसले तर ॲक्शन कधी घेणार? पुन्हा येणाऱ्या हजार शंकाकुशंका अजून विचार करायला लावणार. वाजवी विचार करून वाजवी कृत्य करून टाकले की बरे.आणि सिक्युरिटीची व्यवस्था अगोदर करून ठेवली पाहिजे की नाही आणि असलेल्या गोष्टीचा पुरेपूर आणि योग्य उपयोग करून घेतला पाहिजे की नाही?

तिथे नको तेवढा विचार केला तर नुकसानच होईल.आपापले बैल खातात तर खाऊ देत. त्यांना काम पण तसेच करू दे आणि त्यांची सुरक्षा चोख असू दे. फायदा जास्त होईल त्याने.

एक ना धड...

दहा गोष्टी करायला घ्यायच्या आणि कोणतीही एक नीट करायची नाही हे काही बरोबर नाही. प्रोजेक्ट हाती घ्यावे, नीट हाताळावे, छान पैकी पूर्णत्वाला न्यावे आणि मग त्याच्या ग्लो मध्ये बुडून जावे हे आयडीयल आहे.

पण कधीही एवढी क्लिअर लाईन असलेली प्रोजेक्ट येत नाहीत. एकमेकांत अडकलेल्या तंगड्या सोडवण्यातच सगळी एनर्जी खर्च होते आणि रिसोर्सही. मग काय करावे? "एक ना धड भाराभर चिंध्या" तयार होतात. ना त्या चिंध्यांचे काही करता येत ना त्या टाकून देता येत.

काम केल्याचे क्रेडिट काही मिळत नाही. पण शक्ती आणि खर्च मात्र होऊन जातो. अशी कामे पण शेल्फवर टाकून द्यायला लागतात. कधी भविष्यांत चान्स आलाच तर त्यांना पुन्हा शेल्फवरून उतरवून नवे काही करता येते पण ते फारच क्वचित, बहुतेक वायाच जातात ते श्रम.

पण बहुतेक वेळा हे टाळताच येत नाही. थोडी तुमच्या कारकिर्दीतील कामे आठवून बघा. तुम्हालाही आठवतील अश्या भाराभर केलेल्या चिंध्या.

मग याला उपाय काय? छोटी छोटी मॉड्युल्स करून असे वेस्टेज टाळता येते कधी. अशी युनिट्स पाहिजेत की जी स्वतः एक "धड गोष्ट" असतील, आणि मग पिक अँड चूझ करून चालणारी सिस्टिम, गोष्ट करता येईल.

हे जमले तर ठीकच आहे नाहीतर चिंध्या सांभाळत बसणे.

घरचं झालं थोडं...

दोन गोष्टी ऐकल्या होत्या.
एक खरी होती आणि एक काल्पनिक.

खरी गोष्ट. अमेरिकेत सिव्हील वॉर सुरू होते त्या सुमारास सयामच्या राजाने अब्राहम लिंकन या पत्र पाठवले आणि दोन चार हत्ती अमेरिकेला भेट द्यायची इच्छा दाखवली. ते हत्ती जंगलात काम करायला चांगले पडतील असे कळवले. लिंकन सज्जन माणूस. घरच्या त्रासाने वैतागून गेलेला. त्याने सभ्यपणे सयामच्या राजाला कळवले की आता आम्ही स्टीम इंजिने वापरतो आणि आत्ता हत्ती सांभाळायची आमची परिस्थिती नाही म्हणून. आणि सभ्यपणे ती ऑफर नाकारली.

काल्पनिक गोष्ट. दुष्काळात सारखी परिस्थिती आलेली आहे. घरच्या जनावरांना खायला काय घालायचे याची भ्रांत पडलेली आहे. एका माणसाला त्याच्या व्याह्याने घोडं पाठवलं. आता व्याह्याकडून आलेली गिफ्ट कशी नाकारणार? मुलीच्या सन्मानाचा आणि इभ्रतीचा प्रश्न आला. काय करणार? ठेवून घेतलं घोडं. आता त्याला खाऊपिऊ घाला. घरची जित्राबे इथे उपाशी बसलीत त्यांत हे एक नवे. उद्या परत नाही मागितले तर मिळवली.

मराठीला तीन नवीन वाक्प्रचार मिळाले. "घरचं झालं थोडं आणि व्याह्याने धाडलं घोडं", "पांढरा हत्ती" आणि "दुष्काळात तेरावा महिना".

मुळांत हत्ती पाळणे साध्या माणसाचे काम नाही. त्यात तो पांढरा हत्ती, म्हणजे खाणार पिणार व्यवस्थित पण काम काही करणार नाही. देवाची आज्ञाच आहे ना तशी. पांढरा हत्ती देवाचे वाहन, त्याच्याकडून कोणी काम करवून घेणार का?

आधीच अवघड परिस्थिती आली आणि त्यांत अशी भारी जबाबदारी येऊन पडली अंगावर तर माणूस कातावून न जाईल तर काय होईल. त्यांत पुन्हा कोणी टाळण्यासारख्या नसलेल्या कोणी अशी जबाबदारी टाकली तर काय करायचे?

तुमच्यावर आली आहे का अशी परिस्थिती कधी? मग कसे बाहेर पडलात त्यांतून? घरांत? ऑफिसमध्ये?

मुलींच्या बाबांना आणि मोठ्या साहेबांच्या असिस्टंटना याचा जास्त अनुभव असणार आहे. आपण इथे धरून चाललो आहोत की तुमचे जावई आणि व्याह्यांबरोबर आणि त्या मोठ्या साहेबाबरोबर ठीक चालले आहे म्हणून. त्यांना नाही म्हणणे जवळजवळ अशक्यच असते. अर्धे तरी व्याही आणि सगळे असिस्टंट हे लगेच कबूल करतील.

टॅक्ट, डिप्लोमसी, गोड बोलून कदाचित टाळता येतील असे प्रसंग. पण हे गुण देव सगळ्यांना कुठे देतो. भिडस्तपणा कुठे लपून जात नाही आणि नसलाच तर आपल्याला उद्धट, उर्मट असे सन्मान देऊन जातो.

आपल्या कॅलेंडर प्रमाणे दर तीन वर्षांनी अधिक महिना येतो, वर्षातला तेरावा महिना! आता हा दुष्काळात येणार की सुकाळांत ते आपल्या हातात थोडेच असते?

आता आला तेरावा महिना दुष्काळात तर काय करायचे, हे वाक्प्रचार आठवायचे आणि खाली मान घालून दिवस काढायचे कसे तरी.

घरांत ढेकूण झाले...

"कमले कमला शेते, हरः शेते हिमालये
क्षीराबधौ च हरिः शेते, मनये मत्कुणशंकया"

कोणी आणि कधी हे लिहिले आहे ते तसे समजणार नाही. पण मेसेज एकदम क्लिअर आहे. शाळेत असताना नववी की दहावीत संस्कृतच्या पुस्तकात हा श्लोक शिकवला होता. अगदी मनापासून पटला होता. कारण आमच्या बाकड्यांत असे प्राणी खूप होते आणि संध्याकाळ पर्यंत आमची चामडी अगदी लाल भडक व्हायची. पण त्यांची हाव काही भागायची नाही.

कोणते प्राणी म्हणून काय विचारता? "मत्कुण". म्हणजे ढेकूण हो. इतका रक्तपिपासू प्राणी या पृथ्वीवर कोणताही नसेल दुसरा. ढेकणाची भीती वाटली नाही असा कोण आहे?

ढेकणाची जीवनशैली इतकी कणखर असते की तो दिवसच्या दिवस उपाशी राहू शकतो. अगदी मायक्रोमीटर आकाराच्या फटीमध्ये लपून राहू शकतो. कितीही मारा, धूर द्या, रॉकेल ओता, अगदी ते "टिक२०"औषध" ओता, तो काही नष्ट होत नाही.

त्याला कोणताही सीझन चालतो, अगदी कोरडे वाळवंट आणि गोठवणारे बर्फाचे पहाड आणि ती विषुववृत्तावरची ओली कच्च जंगले

आणि ते रेल्वेचे, बसमधले वास येणारे बाक सुद्धा चालतात. देवाने याहून टफ प्राणी अजून नसेल डिझाईन केलेला. आणि त्याचे प्रजोत्पादन अमेझिंग स्केलचे असते.

एकदा का त्याला कोवळे कोवळे मांसल मांड्या, पोटे, पाठी, दंड सारखे फील्ड मिळाले की मग त्याचा प्रताप दाखवतो. एकावेळी ढेकूण आपल्या ड्राय वजनाच्या तीन चार पट रक्त शोषून घेतो. आणि एकदा तो टम्म फुगला की त्याला चालतासुद्धा येत नाही. रागाने चिरडला की एक विशिष्ट वास येतो. रक्ताचे डाग पडतात ते वेगळेच.

त्याचा उपद्रव अगदी रामायण महाभारत काळापासून असावा. नाहीतर आमच्या ह्या कवी का लेखक असलेल्याला अशी स्फूर्ती कुठून मिळाली असेल?

लाकडी घरे, लाकडी फर्निचर, अगदी लोखंडी कॉटा सुद्धा त्याला स्वर्गीय वाटतात आणि एकदा त्याने जम बसवला की त्याचे उच्चाटन करणे कमला, हर आणि हरी यांनाही जमलेले नाही. उलट तेच हार मानून कमळ, हिमालय किंवा तो महान क्षीरसागर महासमुद्र आपले राहण्याचे ठिकाण करतात. ढेकणाला त्यांचे राज्य अर्पण करून.

तर मग हा पामर मनुष्य काय करू शकणार आहे. घरातले ढेकूण जात नाहीत म्हणून घरच पेटवून देणार आहे का? तसे त्याने करू नये

म्हणून मराठीने त्याला "घरांत ढेकूण झाले म्हणून घर पेटवणार का?" असा सवाल त्याला केला आहे. सवाल तर ठीक आहे, पण मायमराठीकडे त्याचे उत्तर आहे का? घर पेटवून देण्याखेरीज दुसरा इफेक्टिव्ह उपाय आहे का कुणाकडे?

पण असा सवाल माय मराठीने डासाबद्दल केलेला ऐकला नाही कधी. की पिसवा, मुंग्या, उवा, असल्या तसल्याच त्रासदायक प्राण्यांंबद्दल केलेला दिसला नाही कधी.

इथेच ढेकणाचे महत्त्व सिद्ध होते. झाले बहु होतील बहु, परंतु या सम हाच.

तुमच्या घरांत, कॉटमध्ये, गाद्यांत, खुर्च्या सोफ्यांत, ऑफिसच्या त्या डोलणाऱ्या झुलत्या खुर्चीत झाले आहेत का ढेकूण? कधी झाले होते का? मग तुम्ही काय केलेत? बहुतेक काहीच जमले नसेल.

काहीच जमले नसले तर कमला, हर, हरी, ब्रम्हा यांच्यासारखे कमळांत, हिमालयांत किंवा खोल पाण्यांत जाऊन राहिलात का?

खरे खरे सांगा. कारण ढेकणांवर मात करील असा प्राणी देवाने तयार केलेला नाही आजपर्यंत.

दगडापेक्षा वीट मऊ

अडचण आली आहे. अगदी "अटाळणीय" प्रॉब्लेम येऊन पडला आहे डोक्यावर. एक नव्हे दोन प्रॉब्लेम आले आहेत जोडीने. काय करावे कोणता सोडवावा? आणि कसा?

एक मोठे प्रोजेक्ट येऊन पडलेले आहे पदरात. प्रोजेक्ट मॅनेजर असल्यामुळे अजिबात टाळता येणार नाही. जे पडेल ते करावेच लागेल. दोन भाग आहेत प्रोजेक्टचे.

एक म्हणजे परगावी साईटवर जाऊन राहायचे आहे वर्ष दोन वर्षे आणि प्रोजेक्ट संपवून यायचे आहे. काम तसे फार अवघड नाही. कामापेक्षा तिथली परिस्थिती अवघड आहे. साईट कंडीशन जाम कठीण आहेत. कुठेतरी राहायचे, काहीतरी खायचे प्यायचे, डास, उंदीर, माती चिखल, जिकडे तिकडे राडीराड असले वातावरण असणार आहे. काम काही विशेष नाही पण फिजिकल प्रेझेंस पाहिजे.

दुसरे म्हणजे इथेच ऑफिस मध्ये एसी मध्ये बसून त्या प्रोजेक्टचे सपोर्ट काम करायचे आहे. ऑफिस मध्ये यायचे. लागेल तेवढा वेळ थांबायचे. चिकटपणे जे असेल ते, डिझाईन, प्रोक्युरमेंट, व्हेंडरना मोटिव्हेट करणे, साइटवरून जो काही प्रॉब्लेम येईल तो सोडविणे, क्लायंट कडून पार्ट पेमेंट्स वेळच्यावेळी येतात यासाठी भुणभुण लावणे, सतत अव्हेलेबल असणे, रेल्वेच्या बफर सारखे दोन्हीकडून धक्के खाणे, असले. पण दररोज घरी जाऊन जेवता झोपता येईल.

बायकोमुले दररोज दिसतील डोळ्यांना, झोपलेली का असेनात. बाकी कामावर येण्याची वेळ फिक्स्ड असेल, परत जायची नाही.

कोणतातरी एक चॉईस करायलाच पाहिजे. बोला काय करता? आता मराठी म्हणी आठवतात का? ते खास शब्दप्रयोग आठवतात का?

एक म्हणजे "दगडा पेक्षा वीट मऊ" ही. दोन चॉईस पैकी जो कुठला त्यावेळी कमी कठीण तो आपला.

वर्किंग लोकांना, कुठेही वर्किंग असले तरी, हा प्रॉब्लेम सोडवायलाच लागतो कधी न कधी. घरांत, ऑफिसमध्ये, कारखान्यांत, रस्त्यावर, कुठेही.

अगदी आपले पूर्वीचे जंगलातले वास्तव्य असताना खराच कोणी राक्षस येऊन उभा राहिला आणि एका हातात दगड आणि दुसऱ्या हातात वीट घेऊन म्हणाला की "काय हाणू तुझ्या डोक्यावर" तर काय उत्तर दिले असते तुम्ही? डोक्यावर हाणणार हे तर नक्की आहे. टाळण्यासारखे अजिबात नाही. लढाई करून जिंकायचा चान्स नाही. त्या राक्षसाला रडून भेकून दाखवले तरी त्याला काही पाझर फुटणार नाही. मग "आलिया भोगासी असावे सादर" आठवून आपला चॉईस

सांगावा हेच उत्तम. कदाचित दगडाने हळू हाणेल किंवा वीट फुटून जाईल अशी भाबडी आशा धरावी.

आणि अश्या प्रॉब्लेम समोर लोटांगण घालावे. कधीतरी हेही दिवस जातील अशी प्रार्थना करावी. "कठीण समय येता कोण कामास येतो?" हे संत वचन आठवावे. आणि मुकाट्याने आत्मसमर्पण करावे. काय म्हणता? बरोबर आहे का

सुसरबाई तुझीच पाठ मऊ

एखादी कडक स्वभावाची बाई होती का कधी बॉस म्हणून? किंवा शिक्षिका म्हणून? किंवा अगदीच पर्सनल झालेले चालेल तर पत्नी म्हणून? काही बायका आणि बुवे जाम कडक आणि कठीण स्वभावाचे असतात बाबा.

त्यांना एखादी गोष्ट समजावून द्यायची असेल तर जीवावर उदार व्हायला लागते. एवढे करून नाही मानले तर सरळ शेपटी घालायला लागते. नाहीतर रक्तपात ठरलेला, खरा नाही, काल्पनिक किंवा मानसिक म्हणा.

आता अवघड परिस्थितीतून सुटका करून घ्यायची तर दोन उपाय. फाईट आऊट करणे किंवा शरणागती पत्करणे. शेवटी समोरची व्यक्ती बॉस आहे किंवा मॅडम आहे किंवा गृहस्वामिनी आहे हे नाकारता येत नाही. अगदी स्त्री असली तरी तीही तेवढीच शूर, हट्टी आणि समोरच्याचा पराभव करणारी असू शकते.

अशी व्यक्ती आपण कबूल केली आहे मराठीत आणि उपाय सुद्धा कबूल केला आहे. "सुसर बाई तुझीच पाठ मऊ" ही म्हण किंवा शब्दप्रयोग असातसा नाही आलेला. त्याला अनुभवाची भक्कम पायाभरणी आहे. आता इथे सुसरबाई म्हटले आहे म्हणून स्त्रीवर्गाकडे इशारा केला आहे, तसा पुरुषवर्गही येतो या अर्थात.

पण आपण मगर किंवा सुसर स्त्रीलिंगी म्हणतो जरी कोणत्याही लिंगाचे असले तरी. त्याला आमची भाषा उत्तरदायी आहे, आम्ही नाही.

असे पहिल्यांदा कोणी म्हटले असेल? त्या जांभळेवाल्या वानराने की पाण्यांत आणि चिखलात अडकलेल्या गजराजाने किंवा वनराजाने? कोणीतरी असे म्हटलेले असल्याखेरीज अशी म्हण येणारच नाही.

आमच्या नशिबाने आम्हाला असा पळ काढायची वेळ आणली नाही कधी. पण आम्ही अश्या लोकांना आमने सामने भेटलो आहोत ज्यांनी असे म्हणून सुटका करून घेतली आहे.

ऑफिस मधल्या त्या मीटिंग आठवा. तुम्ही कितीही जीव तोडून एखादी गोष्ट पटवून द्यायचा प्रयत्न केला तरी ऑफिसची सत्ता तुमचे काही ऐकत नाही. तुमच्या नाड्या मात्र त्या सत्तेच्या हातात असतात. एकदा विरोध केल्यामुळे मान कोंबड्यासारखी वर काढलेली असते. आता काय करता? सत्तेपुढे शहाणपण चालत नाही याचा वर्षाच्या अंती अनुभव येतोच.

मग थोडाफार विरोध करून शेवटी सुसरबाईच्या पाठीचे कौतुक करून सुटका करून घ्यावी हेच सेफ नाही का?

सर सलामत तो सुसर पचास.

नकटीच्या लग्नाला...

देव जाणे अशी म्हण का आली आहे सगळ्या भाषांमध्ये. पण आहे हे खरे.

आता नकटे किंवा नकटी होणे आपल्या हातात असते का? ती देवाची देणगी आहे. आणि नकट्या लोकांची लग्ने निर्विघ्न होत नाहीत का? मग अशी म्हण येऊन नकट्या लोकांना असे का चिडवतात? आणि नकटे असणे वाईट आहे असा संदेश का देतात?

आम्हाला तर माहीत आहे की एका नकटीने सगळे चित्रपटविश्व जिंकले होते. अगदी पैलवान नटापासून ते सुपर स्टार्स पर्यंत सगळ्यांना जिंकले होते. लाडाची झाली होती ती नकटी. आणि तिचे लग्न अगदी व्यवस्थित थाटामाटाने परदेशी लक्षाधीशाशी झाले आणि ती आमचं दिल तोडून निघून गेली होती. आताआता कळले होते की तिचे सगळे मस्त चालले आहे म्हणून. तिला काही सतराशे विघ्ने आली नाहीत. मग कोणालाही का यावीत?

पण आमची भाषाच अशी. उगाच ठप्पा मारून कोणालातरी नको ते समजणारी.

आता अगदी नाकेल्या, गरुडासारखे किंवा कोल्ह्यासारखे नाक असलेल्या, लोकांचे काय वेगळे चालले आहे? त्यांना अडचणी येत नाहीत का? मग त्यांना मात्र कोणी काही बोलत नाही?

आणि त्या म्हणीतल्या नकटीच्या लग्नाला कोणती सतराशे विघ्ने आली त्याचे वर्णन कोणी केलेले दिसले नाही.

आमचा एक स्वभाव आहे. एखादी गोष्ट सरळ नीट होत नसेल तर काहीतरी आपल्या बाहेरचे कारण सांगायचे आणि आपली कमतरता झाकून त्यावर पांघरूण घालायचे.

आपल्याला नाही जमत, तर दुसऱ्यावर त्याचा दोष टाकायचा आणि आपण नामानिराळे राहायचे असे आहे हे. साडेसाती हा एक तसाच विषय आहे. म्हणे शनी साडेसात वर्षे तुम्हाला छळतो आणि नको जीव करतो. आता तो शनी आपल्या रस्त्याने सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतो आहे. तो काही तुम्हाला त्रास द्यायला का? पण नाही. आपल्या अडचणी, आपली अक्षमता, आपली कमतरता शनीच्या डोक्यावर ढकलून द्यायची की आपण सुटलो.

असे असते का कधी. शनीची साडेसाती तुम्हाला अकल्पनिय यश देऊन जाते, मानसन्मान देऊन जाते. ते काही लक्षांत ठेवणार नाही आम्ही. फक्त जे पाहिजे तसे झाले नाही त्याच्यावर फोकस ठेवणार. नुसते रडतराऊत होणार.

नाकाच्या ठेवणीवर आणि लांबीवर आपले यश किंवा नशीब अवलंबून असते तर आपण आपली नाके प्लास्टिक सर्जरी करून पाहिजे त्या लांबीची योग्य वाटतील अशी करून घेतली नसती का?

त्या नकटीने आपले नाक नक्की मोडीफाय करून घेतले नाही, उलट त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

बायोलॉजी सांगते की उष्ण हवेतल्या लोकांची नाके नकटी होतात आणि थंड हवा ज्यांना घ्यायला लागते त्यांची नाके लांब होतात. नाक हा एअर हीटर आहे असे.

तुम्हाला '"अपरं", म्हणजे गोड शब्दांत नकटे, नाक आहे का? किंवा तुमची बायको, तुमचा नवरा, तुमचा मुलगा, तुमची मुलगी तश्या नाकाची आहे का? नीट विचार करून सांगा, त्या नाकामुळे तुम्हाला अडचणी आल्या आहेत का? उलट मी तर म्हणेन की नकटे नाक बहुतेक वेळा तुमचे सौन्दर्य वाढवते. गरुडासारखे किंवा कोंबड्या सारखे किंवा कोल्ह्यासारखे नाक असलेले लोक नेहमी विघ्नफ्री, चांगल्या नशिबाचे नेहमी यशस्वीच होणारे असतात असे दिसले आहे का?

आता आफ्रिकन लोक जास्त करून नकट्या नाकाचे असतात आणि गोरे उत्तरेचे लोक जास्त करून लांब नाकाचे असतात. म्हणून

गोरे लोक नेहमी हुशार, यशस्वी, दुसऱ्यावर राज्य करणारे असतात असे तर तुम्हाला म्हणायचे नाही ना?

नकटे गोरे किंवा लांब नाकाचे आफ्रिकन किंवा आशियाई लोक पाहिले नाहीत का?

तर सोडा तो विचार. नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने अजिबात येत नाहीत. कोणीतरी लांब नाकाच्या माणसाने हे आणले आहे.

असेल माझा हरी तर..

भक्त सुद्धा चांगले कणखर असतात. देवाची भक्ती करतातच पण देवाला आपला मानतात आणि अगदी हक्काने त्याच्याकडे आग्रह धरतात.

असा एक भक्त आहे. त्याला आपल्या भक्तीवर आणि देवावर पूर्ण विश्वास आहे. त्याच्या आधाराने तो कठीण प्रसंगालाही सामोरा जातो.

अश्या एका भक्ताचे राजाबरोबर काहीतरी भांडण झाले. भक्त तर माणूसच, त्याला राग लोभ असणारच. राजाचे काहीतरी काम त्याने केले नाही. राजा चिडला आणि याला सरळ तुरुंगात टाकून दिले आणि म्हणाला "आता तुला काय मिळते ते बघतो मी". तुरुंग ओपन एअर होता. आणि भक्त कोणी गुन्हेगार नव्हता बंद कोठडीत टाकायला.

भक्तही लेचापेचा नव्हता, त्यानेही सांगितले राजाला की "असेल माझा हरी तर देईल खाटल्या वरी". राजाने शिपायाला सांगितले की याला काही मिळू देऊ नका. दोन दिवस झाले, चार दिवस झाले आमचा भक्त अगदी निर्धास्त होता. त्याला आपल्या देवावर पूर्ण विश्वास होता. पाचव्या सहाव्या दिवशी मोठे वादळ आले. तुरुंगाच्या आवारात फळझाडे होती. ती फळे पडली आमच्या भक्तासमोर. भक्त

खाऊन तृप्त होता. त्याच्या देवाने त्याला खरेच खाटल्यावर दिले अन्न त्याला.

पण सगळे असे भक्त असतात का आणि सगळे देव असे असतात का? काही लोकांच्यात ही वृत्ती असते की मला कष्ट काही करायचे नाहीत. माझ्या नशिबात असेल तर मला ते मिळणारच.

असे लोक खरंच फारसा प्रयत्नच करत नाहीत. सगळा हवाला नशिबावर सोडून बिनधास्त राहतात. आणि त्यांचे काही फारसे बिघडलेले दिसत नाही कारण त्यांच्या अपेक्षाच नसतात. त्यांना हव्याशा गोष्टी नसतात असे नाही, पण त्यासाठी तोशीस घ्यायची त्यांची इच्छाच नसते. तुम्हालाही भेटले असतील असे नग. आता याला बिनधास्तपणा म्हणायचे की बेफिकिरी की अजून काही ते तुम्हीच ठरवा.

लाथ मारीन तिथे

आमची मराठी भाषा इतकी रांगडी पण शुद्ध मनाची आहे ती तिथे हळुवारपणा, कोमलता, स्वप्नीलता, गोड गोड शब्द यांना फारसे स्थान नाही. असे शब्द आहेत पण तेही असे बाहेर पडतात की ऐकणारा घाबरून जावा.

आता आमचा महाराष्ट्र सतत संघर्ष करत राहिलेला प्रदेश आहे, इथली माणसे तशीच कणखर झाली आहेत. तडफदारपणाला आमच्याकडे विशेष महत्व आहे. इतके की तसे नसलेल्या किंवा तसे आहोत हे दाखवू न शकणाऱ्या तरुणाला इथे बायकोच मिळणार नाही. इथल्या माता पराक्रमी, धाडसी, तडफदार असेच पुत्र पसंत करतात आणि इथल्या पत्नी आपला पती धमक असलेला, लाथ मारील तिथे पाणी काढील असा असलेला पसंत करतात. सारखा डिफेन्स करायला लागल्यामुळे आमचे वीर पुरुषाचे स्टँडर्डच असे झाले आहे.

लाथ मारील तिथे पाणी काढील असा वीर पुरुष किंवा लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशी गर्जना करणारा वीर पुरुष नक्की काय करणार असतात? कुठे लाथ मारणार आणि कसे पाणी काढणार? जमिनीला? फत्तराला? डोंगरकड्याला? कशाला लाथ मारणार?

घोषणा तर जबरदस्त आहे पण प्रत्यक्षांत कशी आणायची? की ते त्या त्या वीर पुरुषावर सोडून द्यायचे?

असे म्हणतात की वृद्ध भीष्माचार्य धारातीर्थी पडले असतां वीर अर्जुनाने एक बाण जमिनीत मारून पाणी काढले होते आणि आपल्या या पराक्रमी पितामहाची तहान भागवली होती. शक्य आहे. कुरुक्षेत्राच्या जवळून मोठ्या नद्या वाहतात. त्यांचे पाणी जमिनीत लौकर मुरते कारण तिथे फत्तरच नाहीत. आणि पाणी काढले ते बाण मारून, लाथ मारून नव्हे.

आमचा मर्द मराठा लाथ मारील पण इथे जमिनीत पाणीच नाही, जे आहे ते खोलवर कुठेतरी. आमच्या नद्या तर जरा सूर्य तळपला तर लगेच वाळून जाणाऱ्या. आमच्या विहिरी वसंत ऋतूतच तळ गाठतात. इथे पाणीच नाही फारसे जमिनीत. पण म्हणूनच या लाथ मारून पाणी काढायच्या घोषणेचे महत्व अजून ठळक होते. जिथे सहज पाणी निघेल तिथे लाथ मारून ते बाहेर काढण्यात काय विशेष आहे? इथे या आणि करून दाखवा तसे. आम्ही अशक्य वाटणारी गोष्ट करून दाखवायची धमक दाखवतो.

अशी धमक दाखवणाऱ्या लोकांची मनोवृत्तीच कडक असते. त्यांना शौर्य, वीरता, पराक्रम, शत्रूचा निःपात, तलवारी, समशेरी, भाले बरच्या, कड्या सारखी छाती, वाघाची वृत्ती, सिंहाची शक्ती याचं

गोष्टींचा अभिमान असतो आणि याच गोष्टींची लालसा असते. अशा पुरुषांपासून त्यांच्या स्त्रिया आपली मुलेसुद्धा जपून ठेवत असतील. एकदा ते युद्ध स्फुरण चढले की आमचा हा गडी दुसरे काही बघतच नसेल. त्याच्यापुढे नुसते जाणे सुद्धा भयंकर वाटत असेल.

हा शब्दप्रयोग जबरदस्त आहे यांत काही शंकाच नाही. आणि अश्याच वृत्ती आणि स्वभावामुळे आमचा महाराष्ट्र असा कणखर राहिला आहे. आमची मराठी भाषा सुद्धा अशीच लढाऊ राहिली आहे.

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

कुऱ्हाड लोखंडाची पण तिचा दांडा लाकडी. कुऱ्हाड कश्यासाठी वापरायची हे उघड आहे. तिचा दांडा कुठून आला आणि कशासाठी हेही उघड आहे.

मग आपल्याला आपलाच कोणी धोक्याचा होत असेल तर काय करायचे? दांड्याचे गोत, म्हणजे गोत्र, झाड, वृक्ष किंवा बांबू. कुऱ्हाड दांड्याखेरीज चालवता येत नाही. ती चालायला मदत करणारा दांडा आपल्याच गोताचा नाश करतो आहे त्याला कसे समजावे? कुऱ्हाड आपले काम करते, दांडा त्याचे.

ही म्हण आणणारा नक्की या वेदनेतून गेलेला असणार आहे. आपल्याच लोकांना त्रास होईल असे करणारे असतीलच.

राजाचे कुटुंब आहे, दोन तीन राजपुत्र आहेत, राजा म्हातारा झाला, कोणालातरी राज्य देऊन टाकायचेच आहे. एक तर वाटणी करील आणि सगळ्यांना सारखा हिस्सा देईल किंवा त्यांच्यापैकी एक निवडून त्याला राज्य देऊन टाकील.

पण ज्यांना राज्य मिळाले नाही ते काय करतील. शत्रूला जाऊन मिळतील का? शत्रू ही कुऱ्हाड आणि त्याला मदत करणारा कुऱ्हाडीचा दांडा होईल का? एकंदरीतच ही भावना वेदनाकारी आहे.

पण असे खूपदा झालेले आहे. इतिहास असल्या घटनांनी भरलेला आहे. याला उत्तर काय? की काहीही नाही? सगळ्या जगभरच असे घडले आहे.

अगदी आपल्या रोजच्या जीवनांत असे घडते. लाकूड तासायला लागणाऱ्या हत्यारांच्या मुठी, लाकडी रंधे फळ्या तासायचे, अगदी लेथ वर स्टील काटणारी टूल्स, करवती आपलेच मूळ असलेले लाकूड, स्टील काटतात.

आपल्याच गोतास काळ ठरणाऱ्या व्यक्तींना आपण काय म्हणतो, घरभेदी, खाल्ल्या मिठाला न जागणारा, उपकाराचे ऋण न पाळणारा, देशद्रोही, हरामखोर आणि असेच.

पण हे एक न टाळता येणारे सत्य आहे हेच खरे.

खाल्ल्या मिठाला जागणे

एक गोष्ट वाचली होती, बहुतेक चांदोबा मासिकात. एका श्रीमंत माणसाच्या घरी दरोडेखोर आले. त्याच्या घरांत बघता बघता घुसले आणि त्यांना सगळे दागदागिने, पैसे, मौल्यवान गोष्टी पुढे आणून ठेवायची ऑर्डर सोडली. ती श्रीमंत माणूस हुशार आणि चतुर सुद्धा होता. त्याला या सशस्त्र खुनशी दांडगट लोकांशी सामना करणे शक्यच नव्हते. पण त्याने चातुर्य आणि शहाणपण दाखवले.

आपली सगळी धन दौलत त्या दरोडेखोरांच्या समोर आणून ठेवली आणि हात जोडून त्यांना म्हणाला, "आपण माझे अतिथी, पाहुणे आहात, आपल्याला खूप त्रास झालेला आहे. माझी धनदौलत चंचल आहे आज माझ्याकडे आहे उद्या दुसरीकडे जाईल. पण मी एक गृहस्थ आहे आणि अतिथीचा सन्मान करणे माझे कर्तव्य आहे, तर आपण माझ्याकडे भोजन करावे आणि मग तृप्त होऊन जावे".

दरोडेखोर पण सज्जन असावेत. त्यांनी भोजनाची विनंती मान्य केली.

इथे त्या श्रीमंत माणसाने आपल्या बायकोला सांगितले, "उत्तम स्वयंपाक होऊ द्या. पक्वान्ने होऊ द्यात. पण सगळ्यांत मुठी भरून मीठ टाका". स्वयंपाक झाला, पाने वाढली, हे दरोडेखोर जेवायला बसले. प्रत्येक घासाला खारट चव. सगळ्यांची तोडे खारट झाली. यजमान हात जोडून म्हणाला, "भोजन कसे झाले आहे? आपण प्रसन्न

आहात ना? खाल्ल्या मिठाला जागणे हे सज्जनांचे परम कर्तव्य आहे. आपण समजून काय ते करावे".

दरोडेखोर समजले. या गृहस्थाने शहाणपणाने संकट टाळले ते. ते लोकही सज्जनच होते. त्यांनी सगळे धन तिथेच ठेवून तिथून जाणे त्यांनी योग्य समजले.

पॉईंट असा आहे की मिठाने त्या श्रीमंत व्यक्तीची सुटका केली. पण मीठच असे का करू शकले? साखर, गूळ, धान्य, वगैरे खाद्य गोष्टी तसे का करू शकणार नाहीत? मिठाची दुर्मिळता हे कारण असेल. कोकणात मीठ सहज मिळते. देशावर ते मिळण्यासाठी ते वाहून नेले पाहिजे. जेवढा प्रदेश दूर तेवढी मिठाची किंमत जास्त. दूर डोंगराळ प्रदेशांत तर मीठ मिळत नाही म्हणून गळ्याचे रोग होतात. मिठाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

बहुतेक सर्व भाषांत मिठाला जागणे किंवा खाल्ल्या मिठाला न जागणे यासाठी विशेषणे आहेत. "नमक हराम", "नमक हलाल" ही विशेषणे आपल्यालाही माहीत आहेत.

कोणतीही गोष्ट दुर्लभ झाली की तिची किंमत आणि तिच्या उपयोगाची किंमत वाढत जाते.

तसेच हे "खाल्ल्या मिठाला जागणे" आहे.

काखेत कळसा गावाला वळसा

घरी पाणी आणण्याचे आणि भरायचे काम बायकांचे. त्यासाठी कळशी कडेवर ठेवून नदीवर, विहिरीवर जायचे पाणी भरायचे आणि घरचा हौद, घडा भरून ठेवायचा. हे काम सतत करायचे म्हणून ती कळशी किंवा तिचा तो मोठा अवतार "कळसा" कायम कडेवर आणि त्याला धरून ठेवायला त्याचे तोंड काखेत. जसा काही आपल्या (म्हणजे त्या स्त्रीच्या) अंगाचा भागच झालेला.

एकदा अशीच एक स्त्री गेली नदीवर, पाणी भरले घरचे, तेवढ्यांत कोणीतरी पाहुणे आले. त्यांना स्नान करायचे म्हणून तिला पुन्हा पाणी आण म्हणून सांगितले. "बरं" म्हणाली आणि एक राऊंड अजून करण्यासाठी निघाली. अर्ध्या वाटेत तिला कळसा घेतला की नाही तेच आठवेना. नदीवर जाताना गावात चार पाच थांबे घेत जायची तिची नेहमीची संवय. मग मागे वळून पुन्हा त्या जागांवर जाऊन तिथल्या बायकांना विचारते, "अहो माझा कळसा बघितलात का?", बघते तर सगळ्या बायका तिच्याकडे बघून हसताहेत. ती गेली गोंधळून. तिला त्यांच्या हसण्याचे कारण काही समजेना. मग एका मैत्रिणीला तिची कणव आली, आणि तिने म्हटले, "अग सये, काखेलाच कळसा आहे तर विचारतेस काय?" मग ती स्त्री खजील झाली आणि मराठीला एक म्हण मिळाली, "काखेत कळसा आणि गावाला वळसा".

असे बऱ्याचदा होते की हाताशी असलेली गोष्ट आपल्या इतक्या संवयीची आणि वळणाची होते की तिची आठवणच रहात नाही. मग ती गोष्ट पेन असो की मोबाईल असो.

कधीतरी लक्ककन आठवते की मोबाईल कुठे गेला, सापडत नाहीये. किंवा कानावर ठेवलेली बिडी किंवा पेन्सिल कुठे गेली? टेबलावरचा तो कॅल्क्युलेटर कुठे गेला? ते तिथेच असते. पण अर्धा तास, तासभर शोधल्यावर हात जातो नेहमीच्या ठिकाणी आणि सापडते.

आता याला काय म्हणणार? विसरभोळेपणा? बावळटपणा? काहीही म्हणा. एकदातरी यातून आपण गेलेलो आहोतच. मी तरी नक्की.

नुसते नेहमीचे पँटच्या मागच्या खिशात ठेवलेले पाकीट पोटुलीच्या चोरखिशांत ठेवून बाहेर पडा एकदा. तासाभरात नेहमीच्या संवयीने हात चाचपायला गेला तर हाताला नेहमीचे पाकिट लागत नाही. दचकून धडकीच बसते, शोधाशोध सुरू होते आणि मग कोणीतरी विचारते की "चोरकप्प्यात बघितले का?" हुश्श. जिवात जीव येतो आणि घाम पुसत आपणच म्हणतो, "काय मी बावळट आहे!".

माणूस संवयीचा गुलाम. जरा इकडेतिकडे झाले की अस्वस्थ होणार. म्हणून अंगावर ठेवायच्या गोष्टी तरी त्याच जागी ठेवाव्यात. नाहीतर पॅनिक अटॅक आणि फजिती ठरलेलीच आहे.

म्हणी उगाच पडत नाहीत.

नाचता येई ना अंगण वाकडे

कधी असे जाणवले आहे का की कितीही प्रयत्न केला तरी एखादी गोष्ट होतच नाही नीट. आपण चुकलो का? छे छे, आपले कसे चुकेल. प्रॉब्लेम दुसरीकडेच असणार.

आम्ही करत होतो तेव्हा सगळे कसे व्यवस्थित होते. त्या बघणाऱ्यांनाच समजत नाहीये. आमचे चुकलेच नाही. सगळी सेटिंग चुकीची आहेत. पण मग दोष कुणाचा? ते दुसरे बघणारे म्हणतात की यांना "नाचता येई ना, अंगण वाकडे".

नाचायला बरोबर काटकोनी स्टेज पाहिजे, जरा इकडे तिकडे झाले की आमची थिरकणारी पावले चुकणार. मग ते स्टेज असो की अंगण.

याला अजून एक उपाय आहे. आमचे काही चुकले नाही. ते दुसरे बरोबर नाही.

याला "बळीचा बकरा" शोधणेही म्हणतात.

कसे करायचे? खाली बघा.

बळीचा बकरा

आपण कधीही कोणत्याही चुका करत नाही. आपले सगळे बरोबरच असते. दुसऱ्या कश्याने तरी आपले बिघडते.

आता बघा ना. काल संध्याकाळी रस्त्याने रमत गमत जात होतो. नेहमीची चप्पल पायांत घातली होती. रस्ता सरळ सपाट होता. अचानक ठेच लागली आणि खाली पडता पडता वाचलो. मागे वळून बघितले तर एक दगड होता छोटासा अर्धा जमिनीत घुसलेला, त्यावर चप्पल अडकून ठेच लागली होती. चूक कोणाची होती? माझी? शक्यच नाही! तो दगड तिथे पडला होता म्हणून मला ठेच लागली. कोणी ठेवला तिथे तो दगड? काही लोकांची पर्वा आहे की नाही? आता माझा पाय मुरगळला असता तर? किती खर्च आला असता माहीत आहे का? कोण याला जबाबदार?

आता तो दगड तिथे अनेक दिवस, अनेक महिनेसुद्धा पडून राहिला असेल. देवानेच तो तिथे टाकला नाही कश्यावरून? मग देवच आहे याला जबाबदार! माझी काही चूक नाही! मी काय रस्त्यावरचे दगड बघत पावले टाकायची का?काहीही होवो, पहिल्यांदा दुसरे काही कारण मिळते का ते शोधायचे.

ट्रॅफिक मध्ये लक्ष नसल्याने लाल सिग्नल ओलांडला, दुसऱ्याच्या गाडी वर आपली गाडी मागून ठोकली, अचानक पेट्रोल संपले आणि

गाडी बंद पडली, किल्ल्या हरवल्या, मोबाईल चार्ज डाऊन झाला, कोणीतरी बाईकवाला अगदी जवळून पास झाला, बस किंवा ट्रेन चुकली, दुकान बंद असायच्या दिवशी अर्धा तास चालून बंद दाराचे दर्शन झाले, ट्रॅफिक पोलिसाने लायसेन्स मागितले ते मेलेले सापडले, एक ना दोन.

अश्या वेळी आपण काय करतो? पहिल्यांदा दुसरे काही मिळते का नावे ठेवायला याचा शोध घेतो. काहीतरी मिळतेच. मग त्याच्या माथी सगळा दोष थापून मोकळे होतो. आता ते कारण किंवा ती व्यक्ती जर इतकी स्ट्राँग असेल की म्हणाल त्याचे व्यवस्थित उत्तर देऊन दोष माझा नाही असे ठाम पणे सांगेल तरीही अडखळत, चुकतमाकत "असेल माझी चूक, पण त्यानेही काळजी घ्यायला नको होती का?" अशीही जजमेंट देण्याची शक्यता जास्तच.

घरी आल्यावर मात्र मन खायला लागले की मग विचार सुरू की असेल का माझी चूक त्यांत असे. "माणूस आहे चूक होते, झाली असेल माझी" असे जस्टीफिकेशन वर. "असेल" नाही, "आहे" किंवा "होतीच" पण हे आपले मन सहज मान्यच करत नाही. असे का?

ही एक डिफेन्स सिस्टीम आहे का आपल्या मनाची? आपण निर्दोष मानले स्वतःला तर आपण जास्त चांगले जगू शकतो का? बोल नेहमी दुसऱ्याला लावायचा म्हणजे आपले मन स्वच्छ शुद्ध राहते का?

पण जे व्हायचे ते होऊन गेलेले असते, त्याची जबाबदारी कोणाची? नुकसान झाले ते कोणी सोसायचे?

अगदीच कोणी नाही मिळाले दोष द्यायला तर तो देव किंवा ते नशीब नावाच्या आर्ग्यु न करणाऱ्या गोष्टी आहेतच की.

परीक्षा आली, अभ्यास काही नीट केला नाही, प्रश्नपत्रिका वाचल्यावर घाम फुटला, उकाडा कसला आहे, उत्तरे सुचत नाहीत, सुचली तर हातानी लिहिताच येत नाही, लिहायची प्रॅक्टिस केलीच नाही, ती तासातासाची घंटा वाजली, त्यामुळे टेन्शन आले, बॉल पेनातली शाईच संपली, आता वेळ संपणार, आता माझे काय होणार, रिझल्ट अगदी समोर दिसतो आहे, आता आईबाबांना काय उत्तर द्यावे लागणार?

या सिच्युएशन मधून आपण सगळे गेलो आहोत. जरा आठवा. नंतर कारणेच शोधली आहेत. कधीही स्वतःला दोषी मानलेले नाही. अगदीच पापभिरू किंवा देवाला भिणारे असलो तर थोडी जास्त तयारी केली असती तर बरे झाले असते असा विचार चमकून जाईल पण तो तिथल्यातिथे आपलेच मन हाणून पाडील.

बळीचा बकरा शोधणे हे पहिले काम. अगदी शोधूनही नाही मिळाला किंवा तो बकरा चांगला दणकट असला तर रडत खडत कबूल करायचे की "असेल माझी चूक".

मंडळी, जरा आपल्या अंतर्मनाला स्मरून सांगा की किती वेळा तुम्ही तुमची चूक किंवा पडती बाजू खुल्या दिलाने स्वीकारली आहे?

जर तुम्ही बऱ्याच वेळा असे केले असले तर तुम्हाला संत अशी पदवी अजून पर्यंत कशी मिळालेली नाही? आणि ती मिळाली असेल तर आज पर्यंत आपले चरण कमल आम्ही कसे वंदिले नाहीत. जरा पुढे या, आपले चरण स्पर्श करू आता तरी.

परिपाक

दोन शब्दांत जे सांगता येते ते पानेच्या पाने लिहून आणि तासभर प्रवचन देऊन समजत नाही.

आमच्या भाषा इतक्या समृद्ध आहेत की ही समजावयाची कला अगदी चांगली विकसित केली आहे त्यांमध्ये.

म्हणी, शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार सगळ्या भाषांत आहेत.

आता इथे मराठीतही खूपच म्हणी आहेत पण त्या सगळ्या कोणाला माहीत असतील?

थोड्याफार आठवल्या त्या इथे मांडल्या आहेत.

गोड मानून घ्याव्यात एवढीच विनंती.